“वनेत्तर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन करणे” या योजनेस <u>दिनांक ३१.०३.२०२८ पर्यन्त मुदतवाढ देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : साववि-२०२५/प्र.क्र.३२/वने-११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.अंदाज-२०१५/प्र.क्र.३६/फ-११, दि. १६.०६.२०१५.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सावविं-२०१८/प्र.क्र.११३/फ-११, दि.१३.०६.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र राज्यातील वनेतर क्षेत्रामधील तलाव, सरोवरे, पाणथळे व इतर जलाशय हे जैवविविधतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे नैसर्गिक अधिवास असून विविध प्रकारचे जलचर, स्थलचर, पक्षी, वनस्पती तसेच सूक्ष्मजीव यांचे संरक्षण व संवर्धन करण्यामध्ये त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. याशिवाय हे जलाशय स्थानिक पर्यावरणीय समतोल राखणे, भूजल पुनर्भरण, हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देणे, स्थानिक नागरिकांना स्वच्छ पाण्याची उपलब्धता करून देणे तसेच पर्यावरण शिक्षण व निसर्ग पर्यटनाला चालना देणे या दृष्टीनेही उपयुक्त आहेत.

राज्य शासनामार्फत "वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवर इत्यादी ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन करणे (लेखाशिर्ष २४०६ २२९५)" ही योजना वाचा क्र.१ येथील दि.१६.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असून, तिच्या माध्यमातून जलाशयांतील प्रदूषण नियंत्रण, जलाशय व परिसरातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन, स्थानिक लोकसहभागातून जनजागृती, जैवविविधतेवरील मानवी हस्तक्षेप कमी करणे, स्थानिक नागरिकांना स्वच्छ पाणी उपलब्ध होण्यास सहाय्य करणे, जलाशय परिसर इको-टूरिझमसाठी विकसित करणे, विद्यार्थी व स्वयंसेवी संस्थांच्या सहभागातून वनस्पती व प्राणी जीवनाचा अभ्यास करणे, स्थानिक हितसंबंधांचा जलाशयांवरील परिणाम अभ्यासणे तसेच प्राणी व पक्ष्यांच्या अधिवासांचे संरक्षण व संवर्धन करून त्यांची संख्या वाढविणे इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्यात येत आहेत.

सदर योजनेची अंमलबजावणी झालेल्या कालावधीत जलाशय परिसरातील जैवविविधतेच्या संवर्धनास चालना मिळाली असून स्थानिक समुदायाचा सहभाग वाढण्यास, पर्यावरण जनजागृतीस प्रोत्साहन मिळण्यास तसेच जलाशयांचे शाश्वत व्यवस्थापन करण्यास मदत झाली आहे.

वाचा क्र.१ येथील दिनांक १६.०६.२०१५ च्या शासन निर्णयानुसार योजनेची मुदत सन २०१९-२०२० मध्ये संपुष्टात येत असल्याने वाचा क्र.२ येथील दिनांक १३.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सदर योजनेस सन २०२४-२५ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली होती. सद्यस्थितीत सदर योजनेची मुदत दिनांक ३१.०३. २०२५ रोजी संपुष्टात आली आहे.

सदर योजनेअंतर्गत राज्यातील एकूण १० पाणथळे, सरोवरांचा विकास करण्याची कामे घेण्यात आली होती. त्यापैकी ७ पाणथळ सरोवरांकरीता निधी वितरीत होऊन ३ पाणस्थळांची कामे पुर्ण झाली असून ३ पाणस्थळांची कामे निधी अभावी अपूर्ण आहेत. तसेच एका ठिकाणचे काम स्थानिक नागरीकांचे सहकार्य न मिळाल्याने करता आले नाही. सदर योजनेंतर्गत अपूर्ण राहिलेली कामे पुर्ण करण्यासाठी अतिरिक्त कालावधीची आवश्यकता असल्यामुळे सदर योजनेस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य शासनामार्फत सामाजिक वनीकरण विभागांतर्गत वाचा क्र.१ येथील दि.१६.०६.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत असलेल्या "वनेत्तर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन करणे" या योजनेचा वाचा क्र.२ येथील दि.१३.०६.२०१९ च्या शासन निर्णयान्वये दिलेली मुदत दि.३१.०३.२०२५ रोजी संपुष्टात आली आहे. सदर योजनेच्या कालावधीत हाती घेतलेल्या कामांपैकी अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त कालावधीची आवश्यकता असल्याने सदर योजनेस सन २०२७-२८ पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे. योजनेचा तपशील आणि अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत : -

अ. क्र.	योजनेचे नांव	मागणी क्रमांक	योजनेचा लेखाशीर्ष व सांकेतांक क्रमांक	योजनेचा वाढीव कालावधी
१	वनेतर क्षेत्रातील पाणथळे, सरोवरे इ. ठिकाणच्या जैवविविधतेचे व्यवस्थापन करणे.	सी-७	२४०६ २२९५ (००) (०६) इको टूरिझम / वनक्षेत्रामध्ये पर्यटन विकास (राज्यस्तरीय)	सन २०२५-२६ ते २०२७-२८

अटी व शर्ती :-

अ) सदर योजनेअंतर्गत खालील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी एकूण रु.५१२.९६ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता असून, सदर निधीचा खर्च मूळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेतच करणे आवश्यक राहील. यानुषंगाने, संबंधित कामांचा उद्दिष्टनिहाय सविस्तर निधी मागणी प्रस्ताव शासनास सादर करण्यात आल्यानंतर त्याचा विचार करून आवश्यक निधी वितरित करण्याबाबतचा स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

(रुपये लाखात)

अ.क्र.	वृत्त	विभाग	पाणथळाचे नाव	आवश्यक रक्कम रु. लाखात
१	अमरावती	अकोला	आखतवाडा	५२.०५
२	नाशिक	जळगाव	हत्तनुर	२७०.८६
३	पुणे	पुणे	पाटस मस्तानी तलाव	१९०.०५
एकूण				**५१२.९६**

आ) वरील अपूर्ण कामे दिनांक ३१.०३.२०२८ पर्यन्त पूर्ण करणे आवश्यक राहिल.

इ) सदर योजनेची अंमलबजावणी वाचा क्र.१ येथील दिनांक १६.०६.२०१५ च्या शासन निर्णयामधील विवरणपत्रात नमूद केलेल्या तरतूदीनुसार करण्यात यावी.

२. सदरचा शासन निर्णय मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या मान्यतेनुसार तसेच नियोजन विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.२४८/१४७५, दि.२७.०६.२०२५ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.३८१/व्यय-१०, दि.२९.०४.२०२६ अन्वये प्रस्तावास प्राप्त झालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२११८०७०५१५४० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

JITENDRA S RAMGAOKAR

Digitally signed by JITENDRA S RAMGAOKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=DA1BD25BE62F91C7B60749717D63394F115854B1B30C0D7CDA850348D6A12577, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=067F696C19CDAEAD50B2E37C6C5A94DB09F968C45E35C16617050C2A9D057202, cn=JITENDRA S RAMGAOKAR
Date: 2026.08.21 18:07:59 +05'30'

(डॉ. जितेंद्र रामगावकर)
मुख्य वनसंरक्षक, (मंत्रालय)

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६) प्रधान मुख्य वन संरक्षक, (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
८) वन संरक्षक/ उपवनसंरक्षक (सामाजिक वनीकरण वनवृत्त) (सर्व)
९) विभागीय वन अधिकारी (सामाजिक वनीकरण विभाग) (सर्व)
१०) कार्यासन व्यय-१०, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) कार्यासन -१४७५, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवड नस्ती - कार्यासन वने-११.